# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२०६ दिनांक-२८/०५/२०२४

## Telegram Channel वरील Part Time Job मध्ये ऑनलाईन रेटिंग देण्याचे सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी २,८५,०००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. शर्मा यांनी टेलीग्राम ॲपवर पार्ट टाईम जॉबची जाहिरात पाहिली. सदर जाहिराती मध्ये ऑनलाईन प्रॉपर्टींना रेटिंग दिल्यावर काही रक्कम मिळणार असल्यबाबत नमुद केले होते. रेटिंग देण्याकरीता टास्क विकत घेण्याबाबत नमुद करण्यात आल्याने तक्रारदार यांनी काही टास्क विकत घेतले. परंतु त्यांना कोणताही परतावा न देता आर्थिक फसवणुक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आला होता.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक ७७६-बी/२०२४ दिनांक २०/०३/२०२४ तक्रारी अर्ज प्राप्त होता.)**

नमूद तक्रारी अर्जाचे तसेच गुन्हयाचे अनुषंगाने संबंधीत बँकेसोबत वेळोवेळी पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम वेळीच संशयीत बँक खात्यांमध्ये गोठविण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात जमा होणेकरीता वेळोवेळी संबंधीत बँकेसोबत पाठपुरावा आल्याने **तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी २,८५,०००/- रु त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- Telegram Channel, facebook,Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- Work From Home नावाखाली Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ
नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/ विलास खाटीक, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे,पोअं/१७०५३ शुभम कांबळे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०